...of The C...
...AVATI.
1248
8 अगस्त 2011

D028A

दि. १५.१.२०११ रोजी संघटीत गुन्हेगारी विरोधी लढतांना मृत्यु झालेले पोलीस उपनिरीक्षक दिवंगत संजय चंद्रकांत चौगुले यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक :- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २१ जुलै, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक ६ जुलै, २००५

३) शासन निर्णय क्र.पीडब्ल्युएफ १००८/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक २९ नोव्हेंबर, २००८.

४) शासन पूरकपत्र क्र.पीडब्ल्युएफ १००८/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक २९ ऑगस्ट, २००९.

प्रस्तावना :- पोलीस आयुक्तालय, अमरावती येथील गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संजय चंद्रकांत चौगुले हे दिनांक १५.१.२०११ रोजी ४ पोलीस कर्मचा-यासह मलकापूर येथे राहणा-या आरोपी नामे गोलू यांस अटक करण्यासाठी गेले असता सदर आरोपीने पोलीस पथकांच्या दिशेने गोळीबार केला प्रत्युत्तरा दाखल पोलीस उपनिरीक्षक चौगुले यांनी आरोपींच्या दिशेने गोळ्या झाडल्या. या गोळीबारादरम्यान एक गोळी चौगुले यांना लागून त्यांचा मृत्यु झालेला आहे. ज्या आरोपीला पकडावयास दिवंगत चौगुले गेले होते, तो आरोपी संघटीत गुन्हेगारीतील गुन्हेगार आहे. दिवंगत चौगुले यांचा मृत्यु अशा संघटीत गुन्हेगारीच्या घटनेमध्ये झालेला असल्यामुळे संदर्भिय शासन निर्णयातील तरतूदीनुसार सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- प्रस्तुत शासन निर्णयान्वये पोलीस आयुक्तालय, अमरावती येथील गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संजय चंद्रकांत चौगुले हे दिनांक १५.१.२०११ रोजी ४ पोलीस कर्मचा-यासह मलकापूर येथे राहणा-या आरोपी नामे गोलू यांस अटक करण्यासाठी गेले असता गोळीबारादरम्यान पोलीस उपनिरीक्षक चौगुले यांचा मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाईपोटी रु.९.०० लक्ष व सदर्भिय क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार त्यांच्या रु. २५,३०५/- च्या अंतिम वेतनाच्या २० पट म्हणजेच रु. ५,०२,७००/- असे एकूण १४,०२,७००/- इतके अनुदान मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. याव्यतिरीक्त संदर्भीय क्रमांक ३ येथील शासन निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २००८ मधील अन्य तरतूदी लागू ठरत असल्यामुळे त्या लागू करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या प्रकरणी पोलीस आयुक्त, अमरावती यांना नियंत्रक,आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

77

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०८/११/व्यय-७ २०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, अमरावती.
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
पीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

२६८
20265२5
Fax

78

दि. १५.१.२०११ रोजी संघटीत गुन्हेगारी विरोधी लढतांना मृत्यु झालेले पोलीस उपनिरीक्षक दिवंगत संजय चंद्रकांत चौगुले यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई देण्याबाबत.

The C. P.
741
2011

## महाराष्ट्र शासन

### गृह विभाग

**शासन शुध्दिपत्रक क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ /पोल-७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २३ ऑगस्ट, २०११**

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ/पोल-७, दिनांक २१ जुलै, २०११.

<u>शासन शुध्दिपत्रक :-</u> शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ/पोल-७, दिनांक २१ जुलै, २०११ मधील दुस-या परिच्छेदातील पहिले वाक्य खालीलप्रमाणे वाचावे.

| या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|
| प्रस्तुत शासन निर्णयान्वये पोलीस आयुक्तालय, अमरावती येथील गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संजय चंद्रकांत चौगुले हे दिनांक १५.१.२०११ रोजी ४ पोलीस कर्मचा-यासह मलकापूर येथे राहणा-या आरोपी नामे गोलू यांस अटक करण्यासाठी गेले असता गोळीबारादरम्यान पोलीस उपनिरीक्षक चौगुले यांचा मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाईपोटी रु.९.०० लक्ष व सदर्भिय क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार त्यांच्या रु. २५,३०५/- च्या अंतिम वेतनाच्या २० पट म्हणजेच रु. ५,०२,७००/- असे एकूण १४,०२,७००/- इतके अनुदान मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. | प्रस्तुत शासन निर्णयान्वये पोलीस आयुक्तालय, अमरावती येथील गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संजय चंद्रकांत चौगुले हे दिनांक १५.१.२०११ रोजी ४ पोलीस कर्मचा-यासह मलकापूर येथे राहणा-या आरोपी नामे गोलू यांस अटक करण्यासाठी गेले असता गोळीबारादरम्यान पोलीस उपनिरीक्षक चौगुले यांचा मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाईपोटी रु.९.०० लक्ष व सदर्भिय क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार त्यांच्या रु. २५,३०५/- च्या अंतिम वेतनाच्या २० पट म्हणजेच रु. ५,०६,१००/- असे एकूण १४,०६,१००/- इतके अनुदान मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, अमरावती.

79

महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

८०

७०७

दि.२१.१२.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा ऑलापल्ली रोडवर रंगयापल्ली गावांजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेलेल्या बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या ७ पोलीस शिपायांना तसेच दिनांक ११.०१.२०११ रोजी पुन्नुर येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेले पो.शि./१२५३ श्री माणिक भाऊराव खडसे यांना नुकसान भरपाई देणेबाबत.

पो. म. सं., म. रा. मुंबई
0 | 6 | 2 | 13
2 8 JUL 2011
28-A
109983

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४ अ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २२ जुलै, २०११

बाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८ /पोल-७,
दिनांक १६ मार्च, २००५

<u>प्रस्तावना :-</u> दि. २१.१२.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आलापल्ली रोड रंगयापल्ली गावाजवळ नक्षलवाद्यांनी झाडे पाडून रोड बंद केला होता. ती झाडे बाजूला सारुन वाहतूक पूर्ववत सुरु करण्यासाठी पोलीस कर्मचारी शासकीय वाहनाने जात असतांना मौजे बेजूपल्ली फाटा पास केल्यानंतर मादाराम नाल्याजवळ अज्ञात नक्षलवाद्यांनी आपसात कट करुन वाहनातील पोलीसांना ठार मारण्याच्या हेतूने रोडवर स्फोट घडवून आणला. सदर स्फोटात, सर्वश्री १)पोशि. २३२६ शंकर गोटा, २) पोशि १५७७ विलास पोरतेट,३)पोशि ११३६१ भैय्याजी नैताम ४) पोशि ३०७१ पमेश आत्राम ५) पोशि ३०५३ नरेंद्र आत्राम ६) पोशि ३०३१ शंकर गेडाम, ७) चापोना ४७७ महेश गेडाम हे पोलीस कर्मचारी जखमी झालेले आहेत तसेच दि. ११.१.२०११ रोजी पोलीस पार्टी पेट्रोलिंग व ग्रामभेट करुन मौजा पुन्नु येथून जंगलमार्ग परत येत असतांना अज्ञात नक्षलवाद्यांनी पोलीस पार्टीतील पोलीसांना जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्याजवळील अग्नीशस्त्राने पोलीस पार्टीच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल पोलीसांनी देखील नक्षलवाद्यांवर गोळीबार केला असता सदर चकमकी दरम्यान पोलीस पार्टीतील पोलीस शिपाई /१२५३,श्री माणिक भाऊराव खडसे हे जखमी झालेले आहेत. उपरोक्त दोन्ही घटनेतील जखमी ८ पोलीस शिपायांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु. २.०० लक्ष प्रत्येकी नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

My on file
A
१०।८।११

5.

<u>शासन निर्णय :-</u> प्रस्तुत शासन निर्णयान्वये दि. २१.१२.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आलापल्ली रोड रंगयापल्ली गावाजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात सात पोलीस कर्मचारी जखमी झालेले आहेत. तसेच दि. ११.१.२०११ रोजी पोलीस पार्टी पेट्रोलिंग व ग्रामभेट करुन मौजा पुन्नु येथून जंगलमार्ग परत येत असतांना अज्ञात नक्षलवाद्यांनी पोलीस पार्टीतील पोलीसांना जीवे मारण्याच्या हेतूने त्यांच्याजवळील अग्नीशस्त्राने पोलीस पार्टीच्या दिशेने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात पोलीस पार्टीतील जखमी झालेले पोलीस शिपाई /१२५३,श्री माणिक भाऊराव खडसे अशा एकूण ८ पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लक्ष नुकसान भरपाई प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे. जखमी पोलीस कर्मचा-यांची नावे व त्यांना अदा करावयाची रक्कम याबाबतचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०८/११/व्यय-७ दि.६.४.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुजा-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

२६४
२६३

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४अ/पोल-७,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २२ जुलै, २०११ सोबतचे प्रपत्र "अ"

दि.२१.१२.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आलापल्ली रोडवर रंगयापल्ली गावांजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेलेल्या बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या ७ पोलीस शिपायांना तसेच दि. ११.१.२०११ रोजी पुन्नुर येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेले पो.शि./१२५३ श्री माणिक भाऊराव खडसे यांना नुकसान भरपाई देणेबाबतचा तपशिल :-

प्रपत्र - "अ"

| अ.क्र. | नाव | पद | मंजूर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकर गोटा | पोशि/२३२६ | २.०० लक्ष |
| २ | श्री विलास पोरतेट | पोशि/१५७७ | २.०० लक्ष |
| ३ | श्री भैय्याजी नैताम | पोशि/११३६ | २.०० लक्ष |
| ४ | श्री. पमेश आत्राम | पोशि/३०७१ | २.०० लक्ष |
| ५ | श्री. नरेंद्र आत्राम | पोशि/३०५३ | २.०० लक्ष |
| ६ | श्री. शंकर गेडाम | पोशि/ ३०३१ | २.०० लक्ष |
| ७ | श्री. महेश गेडाम | चापोना/४७७ | २.०० लक्ष |
| ८ | श्री.माणिक भाऊराव खडसे | पोशि/१२५३ | २.०० लक्ष |
| | | एकुण | रु.१६.०० लक्ष |

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

-------------------

83

२५

दि.२१.१२.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा आलापल्ली रोडवर रंगयापल्ली गावांजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेलेल्या बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या ७ पोलीस शिपायांना तसेच दिनांक ११.०१.२०११ रोजी पुन्नुर येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेले पो.शि./१२५३ श्री माणिक भाऊराव खडसे यांना नुकसान भरपाई देणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन शुध्दिपत्रक क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ /पोल-७,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २२ सप्टेंबर, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ/पोल-७, दिनांक २२ जुलै, २०११.

<u>शासन शुध्दिपत्रक :-</u> शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ/पोल-७, दिनांक २२ जुलै, २०११ मधील तिस-या परिच्छेदातील शेवटचे वाक्य खालीलप्रमाणे वाचावे.

| या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|
| याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. | याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. |

file
22/9/11
S.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
पोलीस अधीक्षक, गडचिरोली

महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

गडचिरोली जिल्ह्यात नक्षल विरोधी कर्तव्यावर तैनातीत असतांना दि.१३.०६.२००८ रोजी अपघाती मृत्यु पावलेल्या ४ जवानांच्या कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई देणेबाबत

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०९०८/३८९१/प्र.क्र.५६४/पोल-७,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २९ सप्टेंबर, २०११

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र .पोमसं/२८-अे/४१३७/अपघाती मृत्यु-आ.मदत/८६/२००८, दि.२२.०८.२००८

**प्रस्तावना**

गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलविरोधी अभियानावर कार्यरत असतांना दि.१३.६.२००८ रोजी राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक-४, नागपुर मधील ४ पोलीस हवालदार वन विभागाचे गोडावूनमध्ये मुक्कामाला असताना गोडावून कोसळून त्यांचे भिंतीखाली दबून शहिद झाले. शासन निर्णय, गृह विभाग दि.१६.३.२००५ अन्वये नक्षलवादी कारवाईत मृत वा जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटूंबियांना रु.८.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे. परंतु प्रस्तुत घटनेत नेसर्गिक आपत्तीमुळे पोलीस कर्मचा-यांचा मृत्यु झालेला असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अनुज्ञेय नसल्यामुळे एक **विशेष बाब** म्हणून प्रत्येकी रु.८.०० लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलविरोधी अभियानावर कार्यरत असतांना दि.१३.६.२००८ रोजी राज्य राखीव पोलीस दल गट क्रमांक-४, नागपुर मधील १) पोलीस हवालदार/८१२, अंबादास महादेव राजने २) पोलीस हवालदार/१०२९ नामदेव मुकुंदराव मुळे ३) पोलीस हवालदार/९६०, चंद्रभान पुनाजी मुन ४)पोलीस हवालदार/८९१, रामनाथ रामाधार यादव, हे ४ पोलीस हवालदार वन विभागाचे गोडावूनमध्ये मुक्कामाला असताना गोडावून कोसळून त्यांचे भिंतीखाली दबून मृत्यु पावले. या चार पोलीस जवानांच्या कुटुंबियांना एक विशेष बाब म्हणून प्रत्येकी रु.८.०० लक्ष (रु. आठ लक्ष फक्त) या प्रमाणे एकूण रु.३२.०० लक्ष (रु.बत्तीस लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२१३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो जुलै, २०११ च्या पावसाळी अधीवेशनात, सन २०११-१२ करीता पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

या खर्चासाठी पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व वितरण अधिकारी णून घोषित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३८७/११/व्यय-७ द.२७.६.२०११ व ८३३/अर्थ नं.११, दिनांक ४.७.२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात त आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

त,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उप सचिव, अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१७),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

87

दि.०८.०४.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मौ.कांदोळी जंगल परिसरात त्याचप्रमाणे दिनांक १९.०५.२०११ रोजी नारगुंडा ते हलवेर जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी केलेल्या अंधाधुंद गोळीबारात जखमी झालेल्या पाच पोलीस शिपायांना नुकसान भरपाई देणेबाबत.

पो. म. सं., म. रा. मुंबई

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पूरक ०६११/प्र.क्र.३६५ /पोल-७,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २१ सप्टेंबर, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८ /पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-अे/४१३७/पोकनि ( अंदाजपत्रक) २३४/२०१०, दि.२०.०६.२०११

३) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी नुकसानभरपाई/२९८२/२०११, दिनांक ९.४.२०११

४) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी नुकसान भरपाई/२१९०/२०११, दिनांक २०.५.२०११

<u>प्रस्तावना :-</u> दि. ०८.०४.२०११ रोजी विशेष अभियान पथक प्राणहिता या ठिकाणी कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस स्टेशन एटापल्ली अंतर्गत मौ.कांदोळी जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवत असताना जंगलात दबून बसलेल्या अज्ञात बंदुकधारी नक्षलवाद्यांनी पोलीसांना जीवे मारण्याचा कट करुन त्यांचेवर अंदाधुंद गोळीबार केला. सदर गोळीबारात तीन पोलीस कर्मचारी जखमी झालेले आहेत तसेच दि. १९.०५.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्याचे आस्थापनेच्या सी-६० पोलीस पार्टीमध्ये कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी जिल्ह्यातील पोलीस मदत केंद्र नारगुंडा अंतर्गत नारगुंडा ते हलवेर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या बंदुकधारी नक्षलवाद्यांनी पोलीसांच्या दिशेने केलेल्या गोळीबारात दोन पोलीस जखमी झालेले आहेत.सदर दोन्ही घटनेतील जखमी ५ पोलीस शिपायांना संदर्भीय शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रत्येकी रु. २.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u> दि. ०८.०४.२०११ रोजी विशेष अभियान पथक प्राणहिता या ठिकाणी कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस स्टेशन एटापल्ली अंतर्गत मौ.कांदोळी जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवत असताना जंगलात दबून बसलेल्या अज्ञात बंदुकधारी नक्षलवाद्यांनी पोलीसांना जीवे मारण्याचा कट करुन त्यांचेवर अंदाधुंद गोळीबार केला. सदर गोळीबारात तीन पोलीस कर्मचारी जखमी झालेले आहेत तसेच दि. १९.०५.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्याचे आस्थापनेच्या सी-६० पोलीस पार्टीमध्ये कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी जिल्ह्यातील पोलीस मदत केंद्र नारगुंडा अंतर्गत नारगुंडा ते हलवेर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना जंगलात दबा धरुन बसलेल्या बंदुकधारी नक्षलवाद्यांनी पोलीसांच्या दिशेने केलेल्या गोळीबारात दोन पोलीस जखमी झालेले आहेत.सदर दोन्ही घटनेतील जखमी ५ पोलीस शिपायांना

प्रत्येकी रु.२.०० लक्ष या प्रमाणे एकुण रु.१०.०० लक्ष नुकसान भरपाई प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे. जखमी पोलीस कर्मचा-यांची नावे व त्यांना अदा करावयाची रक्कम याबाबतचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या खर्चाकरीता पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३८९/११/व्यय-७ दि.३०.०६.२०११ व अनौपचारीक संदर्भ क्र.८७६/अर्थ-११, दिनांक ६.७.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पूरक ०६११/प्र.क्र.३६५/पोल-७,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २९ सप्टेंबर, २०११ सोबतचे प्रपत्र "अ"

दि.०८.०४.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील कांदोळी जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेल्या ३ पोलीस शिपायांना त्याचप्रमाणे दिनांक १९.०५.२०११ रोजी नारगुंडा ते हलवेर जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेल्या २ पोलीस शिपायांना नुकसान भरपाई देणेबाबतचा तपशिल.

प्रपत्र - "अ"

| अ. क्र. | दिनांक | नाव | पद | मंजूर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | ०८.०४.२०११ | श्री. प्रशांत भाऊदास मेश्राम | पोशि/१११७ | २.०० लक्ष |
| २ | -----"---- | श्री शंकर नारु पुंगाटी | पोशि/३०२५ | २.०० लक्ष |
| ३ | -----"----- | श्री सुनिल दुर्गा तोरे | पोशि/१३८३ | २.०० लक्ष |
| ४ | १९.०५.२०११ | श्री. शंकर कोटुजी कोवासे | पोशि/८५८ | २.०० लक्ष |
| ५ | -----"----- | श्री. साधु विजा पल्लो | पोशि/२७६७ | २.०० लक्ष |
| | | | एकुण | रु.१०.०० लक्ष |

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

-------------------

पों. म. रा. पा. वा. मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| 0 | 6 | 2 | 0 |

- 3 OCT 2011

| | | | |
|---|---|---|---|
| 26A | | 7 | 9 |

आवक क्र. 142931

90

३१६

दि.०८.०४.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील मौ.कांदोळी जंगल परिसरात त्याचप्रमाणे दिनांक १९.०५.२०११ रोजी नारगुंडा ते हलवेर जंगल परिसरात नक्षलवाद्यांनी केलेल्या अधांधुद गोळीबारात जखमी झालेल्या पाच पोलीस शिपायांना नुकसान भरपाई देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन शुध्दिपत्रक क्रमांकः- पूरक ०६११/प्र.क्र.३६५ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः- ०१ आक्टोबर, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पूरक ०६११/प्र.क्र.३६५/पोल-७, दिनांक २९ सप्टेंबर, २०११.

<u>शासन शुध्दिपत्रक :-</u> शासन निर्णय,गृह विभाग, क्रमांक-पूरक ०६११/प्र.क्र.३६५/पोल-७, दिनांक २९ सप्टेंबर, २०११. मधील दुस-या परिच्छेदातील शेवटचे वाक्य खालीलप्रमाणे वाचावे.

| या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|
| याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. | याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो जुलै, २०११ च्या पावसाळी अधीवेशनात, सन २०११-१२ करीता पूरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु.२५०.०० लक्ष अनुदानातून भागविण्यात यावा. |

on file
7/10/11

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सही)
(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली

पोलीस अधीक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
वीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

92

गडचिरोली जिल्ह्यातील विविध घटनेत
नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या
पोलीसांना नुकसान भरपाई देणेबाबत.


प्रो. म. सं. म. रा. मुंबई
6 2 13
- 6


# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्युएफ ०३१२/प्र.क्र.१४६ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- २ जुन, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८ /पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८-अे/४९३७ /सा.अ. (नु.भ.) -शहिद/४४/२०११, दि.१७.०३.२०१२.

३) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र.डी-१२/जखमी/ नुकसानभरपाई/७९३/ २०११, दिनांक २२.०८.२०११.

४) पोलीस अधीक्षक, गोंदीया यांचे पत्र क्र.कक्ष-पेंशन/लेखा/नुकसा भरपाई/शहिदा/ २०११/८४०८, दिनांक ०३.१२.२०११.

**प्रस्तावना :-** दि.१४.०१.२०११ रोजी पोलीस मदत केंद्र मुरुमगाव हद्दीत गुरेकसा जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवून वाहनाने परत येत असतांना येरकड गावाजवळ असलेल्या पुलावर लपून बसलेल्या नक्षलवाद्यांनी सदर वाहन पुलावर जाताच भूसुरुंग घडवून आणला या भूसुरुंगाच्या स्फोटात जखमी झालेले एक पोलीस शिपाई व एक पोलीस हवालदार तसेच, दिनांक ०८.०८.२०११ रोजी मौ.कामनगड येथे राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या श्रीमती शांता सिन्हा यांचा कार्यक्रम होता. त्यांचेकरीता कामनगड ते पेंढरीकडे रोड ओपनींग करत असतांना दुपारी १५.१५ वाजता नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात जखमी झालेले दोन पोलीस शिपाई,त्याचप्रमाणे दिनांक दि.२०.०८.२०११ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे अधिकार क्षेत्रातील उपविभाग गडचिरोली अंतर्गत पोलीस मदत केंद्र पोटेगाव हद्दीत मौजा माकडचुवा परिसरात, नक्षलविरोधी अभियान राबविताना बंदुकधारी नक्षलवाद्यांनी अग्निशस्त्रातून केलेल्या अंदाधुद गोळीबारात जखमी झालेले पोलीस उपनिरीक्षक अशा एकुण तीन घटनेतील १ पोलीस उपनिरीक्षक, १ पोलीस हवालदार व ३ पोलीस शिपाई यांना संदर्भीय शासन निर्णयातील तरतूदीनुसार पोलीस शिपाई यांना प्रत्येकी रु. २.०० लक्ष पोलीस हवालदार यांना रु.२.३० लक्ष व पोलीस उपनिरीक्षक यांना रु.२.६० लक्ष याप्रमाणे एकुण रु.१०.९० लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या तिन्ही घटनेतील जखमी ३ पोलीस शिपायांना प्रत्येकी रु.२.०० लक्ष याप्रमाणे एकुण रु.६.०० लक्ष, १ पोलीस हवालदार यांना रु.२.३० लक्ष तसेच १ पोलीस उपनिरीक्षक यांना रु.२.६० लक्ष असे एकुण रु.१०.९० लक्ष (अक्षरी रु.दहा लाख नव्वद हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे. जखमी पोलीस अधिकारी/कर्मचा-यांची नावे व त्यांना अदा करावयाची रक्कम याबाबतचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावतांना जखमी झालेल्या पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१२-१३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. जखमी ३ पोलीस शिपायांना प्रत्येकी रु.२.०० लक्ष, १ पोलीस हवालदार यांना रु.२.३० लक्ष तसेच पोलीस उपनिरीक्षक यांना रु.२.६० लक्ष इतकी रक्कम अदा करण्याकरीता पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२१९/१२/व्यय-७ दि.९.४.२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्युएफ ०३१२/प्र.क्र.१४६ /पोल-७, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ०२ जुन, २०१२ सोबतचे प्रपत्र "अ"

गडचिरोली जिल्ह्यातील विविध घटनेत नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या पोलीसांना नुकसान भरपाई देणेबाबतचा तपशिल.

प्रपत्र - "अ"

| अ.क्र. | घटनेचा दिनांक | पोलीसाचे नाव | पद | मंजूर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | १४.०१.२०११ | श्री. भोजेंद्र पासांडे | नापोशि/११३६७ | २.०० लक्ष |
| २ | -----"---- | श्री प्रशांत मुक्तावरम | चापोहवा/११९१ | २.३० लक्ष |
| ३ | ०८.०८.२०११ | श्री सिप्रीयन बढा | नापोशि/२१०६ | २.०० लक्ष |
| ४ | -----"---- | श्री. राजू जोगा कांदो | पोशि/५३३ | २.०० लक्ष |
| ५ | २०.०८.२०११ | श्री. विठ्ठल एस पवार | पोलीस उप निरीक्षक | २.६० लक्ष |
| | | | एकुण | रु.१०.९० लक्ष |

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

--------------------